3५

महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायत क्षेत्राची निवडणुकीच्या प्रभागामध्ये विभागणी करणे

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**क्रमांक-मनप-२००४/प्र.क्र. ३६/का-५,**
**दिनांक- ७ डिसेंबर, २००४.**

## नि दे श

राज्य निवडणूक आयोगाचा निदेश क्रमांक-एसईसी-१९९६/प्र.क्र.४/९६/का-३, दिनांक- ४ एप्रिल, १९९६ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्राची निवडणूक प्रभागामध्ये विभागणी कशी करावी, यासंबंधी सूचना निर्गमित झाल्या आहेत. त्या निदेशासोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये प्रभाग रचना कशी करावी, यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले आहे. त्या मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद (५) "प्रभाग निश्चितीची सुरुवात करताना प्रथम उत्तर दिशेकडील (वायव्य कोप-यातून) जनगणना कार्यालयाने निश्चित केलेली जनगणना वॉर्डाची सीमा विचारात घेऊन सुरुवात करावी, आणि पुढे घडयाळाच्या फिरण्याच्या दिशेने व आवश्यक तिथे झिगझॅग पध्दतीचा अवलंब करुन भौगोलिक सलगता राखून प्रभागाची रचना करावी." त्याऐवजी पुढील परिच्छेद क्रमांक-(५) दाखल करण्यात येईल.

(५) "प्रभाग निश्चितीची सुरुवात करताना प्रथम उत्तर दिशेकडून जनगणना कार्यालयाने निश्चित केलेली जनगणना वॉर्डाची सीमा विचारात घेऊन सुरुवात करावी, आणि पुढे घडयाळाच्या फिरण्याच्या दिशेने व आवश्यक तिथे झिगझॅग पध्दतीचा अवलंब करुन भौगोलिक सलगता राखून प्रभागाची रचना करावी."

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
३. विभागीय आयुक्त (सर्व)
४. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
५. जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
६. मुख्याधिकारी, नगर परिषद (सर्व)
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
८. निवड नस्ती